८.०० २१.०४.२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ११/०४/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

केंद्र सरकारच्या केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातर्फे राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) तसेच १५ वा वित्त आयोगाअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेस वर्ष २०१९-२० व २०२०-२१ करीता (NCAP) अंतर्गत रू.२.१० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे १५ वा वित्त आयोगाअंतर्गत (Air Quality Improvement) करीता वर्ष २०२०-२१ ते २०२२-२३ पर्यंत एकुण रू.२५.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी १. ०२ पावर डस्ट स्विपिंग मशिन खरेदी करणे,२. ०२ मिस्ट स्प्रे मशिन खरेदी करणे, ३. डम्पिंग ग्राऊंड तसेच ट्रॅफिक सिग्नलवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे ४. शहरातील चौकांमधील कारंजांची देखभाल/दुरुस्ती करणे ५.रस्त्यांवरील चौकांमध्ये Verticle Garden तयार करणे ६.नागरीकांना हवेची गुणवत्ता समजण्यासाठी फलक प्रसिध्द करणे,६. नविन रस्ते तयार करणे ७. रस्त्यांवरील खडडे भरणे, ८. कंपोस्ट पिट तयार करणे ९. CNG based Crematorium तयार करणे, १०. Animal Incineration मशिन बसवुन मृत प्राण्यांचे अवशेष नष्ट करणे ११. शहरातील नागरीकांसाठी २० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी करून बससेवा सुरु करणे, वृक्ष लागवड करणे, नागरीकांमध्ये जनजागृती करणे अशी विविध कामे हाती घेण्यात आली असुन त्यापैकी काही कामे पुर्ण झाली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर सुरु आहेत.

केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. नरेश पाल गंगवार यांचेमार्फत दुरदृष्यप्रणालीद्वारे दिनांक १८/०४/२०२३ रोजी देशभरातील सर्व राज्यांमध्ये हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी नगरपालिका/नगरपरिषद/महानगरपालिकांना देण्यात आलेल्या निधीतुन हाती घेण्यात आलेल्या कामांचा व शहरातील हवेच्या गुणवत्तेत झालेला बदल याबाबत आढावा बैठक घेण्यात आली होती. सदर आढावा बैठकीमध्ये

देशभरातील सर्व राज्यांमधील शहरांपैकी (वर्ष २०१७-२०१८) च्या तुलनेत (वर्ष २०२१-२०२२) मध्ये उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता (PM१०) १५५ वरून ७७ म्हणजे ५०टक्के कपात झाल्याचे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात दर्शविण्यातआले आहे. तसेच देशभरातील सर्व शहरांमधून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणा-या ११ शहरांमध्ये उल्हासनगर शहर दुस-या क्रमांकावर आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारत असल्याची दखल केंद्रीय पर्यावरण मंत्रालयानेदेखील घेतलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक उपक्रम हाती घेऊन त्यांचे नियोजन करणे यासाठी मा. आयुक्त अजीज शेख, अति. आयुक्त, डॉ. करुणा जुईकर, उप-आयुक्त (पर्यावरण), डॉ. सुभाष जाधव यांचेकडून पर्यावरण विभागास मार्गदर्शन केले जात असुन सौ. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांच्यामार्फत हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून दिलेल्या मार्गदर्शनानुसार महापालिकेच्या सार्व. आरोग्य विभाग, सार्व. बांधकाम विभाग, वाहन विभाग, विद्युत अभियांत्रिकी विभाग, पाणीपुरवठा विभाग यांचेमार्फत प्रस्तावित कामांची पुर्तता करून घेतली जात आहे.

उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता यापुढेही चांगली राखण्यासाठी शासनाकडून देण्यात येणा-या निधीचा योग्य वापर करून आवश्यक कामे करण्याचा महापालिकेचा मानस राहिल.

२१/४/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव सादर.